# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDO ASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २०५ वा गुरूवार दि.११ जानेवारी २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लातूरला जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये प्रस्तावित नियतव्ययापेक्षा अधिक निधी देणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

लातूर, दि. १० (जिमाका) : जिल्हा वार्षिक योजनेचा २०२४- २५ अंतर्गत लातूर जिल्ह्याला ३२३ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित असून पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार यांची मागणी लक्षात घेऊन यापेक्षा अधिकचा निधी दिला जाईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री अजित पवार यांनी दिली. सन २०२४-२५ करिता दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित जिल्हा वार्षिक योजनेच्या राज्यस्तरीय बैठकीत ते बोलत होते. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव सौरभ विजय, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातून आमदार धीरज देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी नमन गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने नियतव्ययपेक्षा अधिकच्या निधीची




मागणी केली आहे. त्याचा विचार करून ३२३ कोटीपेक्षा अधिकचा निधी दिला जाईल. वाढ करताना त्या जिल्ह्याची लोकसंख्या, भौगोलिक स्थान याचा विचार केला जाईल. त्या-त्या विभागाच्या यंत्रणांनी दिलेल्या निधीचा योग्य आणि न्याय कामासाठी वापर होईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिल्या. पालकमंत्री गिरीश महाजन यांनीही जिल्ह्याला निधी वाढवून देण्याची मागणी केली. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांनी उदगीर येथे होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज नाटयगृहाला तसेच उदगीर येथील शासकीय रुग्णालयासाठी निधी वाढवून मिळावा, अशी मागणी केली.औसा येथील तालुका क्रीडा संकुलासाठी, कोयना भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जसा निधी मिळतो तसाच निधी किल्लारी भागाला मिळावा तसेच हसूरी आणि परिसरात नेहमीच भूकंपाचे हादरे बसत आहेत. त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्यासाठी १५ कोटीचा निधी मिळावा, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाली असून त्यासाठी भरीव निधीची गरज असल्याचे सांगून जिल्हा परिषद शाळांची पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती व्हावी, यासाठी आमदार धीरज देशमुख यांनी मागणी केली.जिल्ह्याचा २०२४-२०२५ चा वार्षिक नियतव्यय, जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजना त्याला लागणारा वाढीव निधी याबाबतचे सादरीकरण जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी केले.

# राज्यात ओबीसी आरक्षणाची टक्केवारी २७ वरून ३८ करा

राज्यांमध्ये बांठीया आयोगाच्या माध्यमातून इम्पीरीकल डाटा प्राप्त झाला आहे. बांठीया आयोगाच्या अहवालानुसार ३७.७० टक्के ओबीसी असल्याचं म्हटलं आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या रीट पिटीशन २५९/९४ यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार (२०१०) जर एखाद्या राज्याने ओबीसीचा इम्पीरीकल डाटा गोळा केला.तर एकूण ओबीसीची टक्केवारी ५० टक्के च्या वर जाऊ शकते असा निवाडा दिलेला आहे. याच निवाड्यानुसार तामिळनाडूचे आरक्षण वाढविण्यात आले होते. आता राज्यात सुद्धा ओबीसीला २७ टक्क्यांऐवजी ३८ टक्के आरक्षण देता येईल आणि त्यामुळे एकूण आरक्षण राज्यात ५८ टक्के होईल असे ओबीसी नेते, आरक्षणाचे अभ्यासक हरिभाऊ राठोड यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.राज्यात सध्या आरक्षणावरून मराठा आणि ओबीसीमध्ये संघर्ष सुरू



झालेला आहे. यात मराठा आरक्षणाचा प्रश्न जटिल झालेला आहे. या परिस्थितीत हे वाढीव आरक्षण मिळाल्यामुळे राज्यातला हा जटिल प्रश्न सोडविणे सोपे झाले आहे असे राठोडाचे म्हणणे आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाची फेररचना करून ओबीसी उपवर्गीकरण केल्यानंतर भटके, विमुक्त, धनगर, बंजारा, वंजारी, बारा बलुतेदार, एसबीसी, माळी, तेली, आगरी, भंडारी, मराठा कुणबी, लेवा पाटील, पाटीदार आणि राजपूत या सर्व समाजाचे समाधान होईल असा फार्मूला हरिभाऊ राठोड यांनी तयार केला आहे.या फार्मुल्यानुसारच मराठा समाजाला आरक्षण देता येईल जेणेकरून ओबीसीच्या मूळ २७ टक्के आरक्षणाला धक्का लागणार नाही आणि मराठा समाजाला सुद्धा योग्य प्रमाणात आरक्षण देता येईल आणि खऱ्या अर्थानं सर्व समाज घटकांना सामाजिक न्याय देता येईल, असंही राठोड यांचं म्हणणं आहे.मराठा आणि ओबीसी एकमेकांसमोर भारत पाकिस्तानसारखी लढाई लढत असल्याचं दिसून येतं, ही लढाई बंद करावी आणि ओबीसी नेत्यांनी हरिभाऊ राठोड फार्मुल्याच अभ्यास करावा, असं आवाहन बिगर राजकीय पक्षाच्या विचारवंताना राठोड यांनी दिला आहे.

# वंचित बहुजन आघाडी उत्तर मुंबई जिल्हा महासचिव ड.अनिल ढवळे यांचा

मुंबई / शहामत शेख:- वंचित बहुजन आघाडी पक्षात उत्तर मुंबई जिल्ह्यात महासचिव पदी पक्षाचा धुरा सांभाळत असताना तसेच वेळप्रसंगी मोर्चे आंदोलन सभा यात कायदेशीर बाजू सखोलपणे मांडणारे अत्यंत प्रामाणिक निष्कलंकिय आदरणीय ॲड बाळासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू व कट्टर समर्थक मानले जाणारे पेशाने मुख्याध्यापक शिक्षक,वकील असणारे एडवोकेट अनिल ढवळे यांचा वाढदिवस ०९ जाने रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. ॲड ढवळे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. कायद्याची पदवी संपन्न केले. नांदेड जिल्हा हे आंबेडकर चळवळीचे केंद्रबिंदू राहिले आहे. सन १९९० दरम्यान नांदेड जिल्हा, लोकसभा मतदारसंघातून



ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांनी माजी मुखमंत्री अशोक चव्हाण यांच्या विरोधात लोक सभेची निवडणूक लढवली ,यावेळीस सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहूजन आघाडी असा त्यांचा प्रवास राहीला आहे कालांतराने उदरनिर्वाह करिता तसे पेशाने मुख्याध्यापक शिक्षक,वकील असल्याने मुंबई स्थायिक झाले. पक्ष व चळवळीबद्दल असलेले निष्ठा राखत पक्षाने उत्तर मुंबई महासचिव पदी जबाबदारी सोपवली आहे. तसेच समाजकारण व राजकारण याची उत्तम जाण असलेला प्रशासकीय यंत्रणा धारेवर धरणारे नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र ॲड.ढवळे यांचा वाढदिवस समविचारी आंबेडकर चळवळीचे पक्ष व संघटना कार्यकर्ते व वंचीत बहुजन आघाडीचे पदाधिकारी च्या वतीने केक कापून साजरा करण्यात आला याप्रसंगी उत्तर मुंबई जिल्हा, महिला आघाडी, युवा आघाडी मुंबई प्रदेश उपाध्यक्ष राजा भालेकर,मुंबई प्रदेश संघटक दीपक हनवते,मुंबई प्रदेश महिला सचिव मगर ताई,उत्तर मुंबई जिल्हा युवा अध्यक्ष अजय रोकडे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन कांबळे,जिल्हा संघटक गायकवाड युवा महासचिव रफिक खान, युवा उपाध्यक्ष आरिफ पठाण, दहिसर ता. अध्यक्ष

# शारदा वृद्धसेवाश्रम आयोजित दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळा दिमाखात संपन्न

सांगली :- दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित.. शारदा वृद्धसेवाश्रम संकुलच्या वतीने बालगंधर्व नाट्यमंदिर मिरज येथे आयोजित केलेला, दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला. भव्यदिव्य नेत्रदीपक आशा अविस्मरणीय सहळ्यामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून निवड केलेल्या दिग्गज प्रतिभावंत व्यक्तींना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा महाराष्ट्रतील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे आणि अनाथांची नाथ, समाजसेविका मा. शारदा लोंढे यांच्या अथक परिश्रमातून संपन्न झालेल्या दिमाखदार पुरस्कार प्रदान सोहळ्यास अध्यक्ष म्हणून जीवन ज्योत कॅन्सर रिलीफ अँड केअर ट्रस्ट मुंबईचे संस्थापक अध्यक्ष मा. हरखचंद सावला, स्वागताध्यक्ष मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी मा.डॉ. रवींद्रकुमार ताटे आणि प्रमुख पाहुणे दीपस्तंभ शैक्षणिक फाउंडेशनचे संस्थापक मा. वासुदेव कांबळे सर लाभले. तर माजी समाजसेवा वैद्यकीय अधीक्षक मा. भूषणी दीप, समाजसेवा वैद्यकीय अधीक्षक मा. संजय खाडे आणि समाजसेविका मा. मिनाबेन मारू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष हिंदरत्न दिपक लोंढे व शारदा वृद्धसेवाश्रम संकुलच्या संचालिका मा. शारदा लोंढे या उभयतांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. हरखचंद सावला आणि मा. निर्मला सावला या उभयतांचा विशेष नागरी सत्कार केला. तर दीपस्तंभ शैक्षणिक फाउंडेशनच्या वतीने या संस्थेचे संस्थापक मा. वासुदेव कांबळे आणि मित्रपरिवार यांनी श्री./सौ. लोंढे उभयतांच्या समाजसेवा आणि देहदान प्रित्यर्थ सर्व साक्षीने भव्यदिव्य असा सत्कार केला. हिंदरत्न दिपक लोंढे यांचे स्वागत प्रास्तविक भाषण ऐकून नाट्यगृहातील उपस्थितांना गहिवरून आले. तर मा. सुशिला आडके, अमित उर्फ आम्रपाली मोहिते, अमर जाधव, दीपाली कांबळे, अक्षता झेंडे आणि नकुसा मासाळ यांच्या खडतर जीवनप्रवासाचे शब्दांत वर्णन करतांना उपस्थित मान्यवर भारावून गेले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. हरखचंद सावला आपल्या मार्गदर्शक भाषणात म्हणाले. समाजभान राखून दीनदुबळे, वंचित, उपेक्षित, अनाथ, निराधार आणि बेघर वृद्ध मायबाप आणि लेकरांच्या कल्याणासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या, त्यांची मनोभावे निस्वार्थपणे सेवा शुश्रूषा करणाऱ्या लोंढे उभयतांच्या पाठीशी आपण सर्वजण सदैव उभे राहून, त्यांचे स्वप्नातील हक्काचे शारदा वृद्धसेवाश्रम उभे करण्यास आपण सर्वांगाने मदत करूया असे आवाहन करत, एकदिवस जगाच्या इतिहासात शारदा वृद्धसेवाश्रम आणि परिवाराचे नाव अजरामर राहील इतके पवित्र काम हे उभयंत करत आहेत. यात तिळमात्र शंका नाही. असे म्हणत. त्यांनी शारदा वृद्धसेवाश्रम संकुल करिता एक अंबुलन्स आणि अति उच्च दर्जाची व्हील चेअर देऊ केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा विशेष नागरी सत्कार मूर्ती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण पुणे हे संसदीय स्थायी समितीचा अचानक अभ्यास दौरा आल्याने कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाही. पण त्यांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क करत सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी शारदा वृद्धसेवाश्रम आणि आभार मानले. अमित-अवधूत प्रस्तुत स्पर्श स्वर शब्दांचा एक सुरेल मैफिल द्वारे राष्ट्रभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तर सुत्रसंचालक मा. शिवानंद स्वामी यांनी आपल्या



परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून शासकीय पातळीवर आणि व्यक्तिशः सर्वोपतरी मदत करेन अस आश्वासन देत. पुरस्कारार्थी यांचे अभिनंदन केले. त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मा. नकुसा मासाळ, तृतीयपंथी मा. अमित उर्फ आम्रपाली मोहिते आणि विकास सुर्वे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. डॉ. रवींद्रकुमार ताटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सर्वांचे निवेदक शैलीने सर्वांची मने जिंकली. सोहळ्याचे प्रत्येक अविस्मरणीय सुवर्णक्षण मा. अनिल बामणे आणि मा. अक्षय पाटील यांनी आपल्या कॅमेरात कैद केले. राष्ट्रीय खेळाडू तथा संस्थेचे उपाध्यक्ष मा. आर्यदिप लोंढे, श्रीआर्य लोंढे, विनिता लोंढे, वैदिक लोंढे, सचिव विनय नांदे आणि मित्रपरिवाराने कार्यक्रमाचे नियोजन करत, विशेष परिश्रम घेतले.

# उल्हासनगर येथे गोशाळेच्या व्यवस्थापना कडुन गाईंवर दुर्लक्ष, एका गायीचा मृत्यु

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर कँप ५ येथील प्रसिद्ध राधेश्याम गौशाळे मध्ये १७०० गायी आहेत. मात्र ही गोशाळा चालवणारे व्यवस्थापन हे या गायीवर लक्ष देत नसल्याने काल एका गाईचे निधन झाले आहे. ही माहीती गौरक्षक निखील गोळे यांना मिळताच त्यांनी त्या गोशाळेवर धडक देत व्यवस्थापनाचा चांगलाच समाचार घेतला. सदर गाईला झाकुन व बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. दरम्यान सत्येन पुरी व त्यांची टीम देखिल गोशाळेत दाखल झाल्यावर त्यांनी चांगलाच हंगामा केला. त्या नंतर त्या गाईवर अंतिम संस्कार करण्यात आले. उल्हासनगर शहरात सात ते आठ गोशाळा आहेत एका ही गोशाळेची नोंद महापालिके कडे नाही. ह्या गोशाळा बेकायदेशीर असुन यातुन व्यवस्थापनाला फायदा होत आहे. गेल्या महिन्यात एका गोशाळेत गाईचा मृत्यु झाला होता तेव्हा महापालिकेने या गोशाळाना दंड आकारला होता. दरम्यान आज कँप ५ येथील राध्येश्याम गोशाळेत एका गाईचा मृत्यु झाला असल्याची माहीती गोरक्षक निखिल गोळे व सत्येन पुरी यांना मिळाली तेव्हा त्यांनी गोशाळे मध्ये जावुन स्वामी देवप्रकाश महाराज यांची भेट घेवुन गायीवर दुर्लक्ष केल्याचा आरोप करुन सदर गायीवर अंतिम संस्कार करा असे सांगितल्यावर ट्रस्टी सतीश नंदवानी यांनी गोरक्षका सोबत दादागिरीची भाषा केली. तेव्हा हे गोरक्षक जाग्यावरच धरणे आंदोलनाला बसलेत. दरम्यान स्वामी देवप्रकाश यांच्या विनंतीवरुन धरणे मागे घेवुन त्या गाईवर अंतिम संस्कार करण्यात आले. १७०० गायी असलेल्या या गोशाळा मध्ये एक प्रशिक्षित कंपाऊंडर असुन एक डिप्लोमा होल्डर डॉक्टर आहे. त्यामुळे या गाईवर उपचार होत नाहीत . त्यामुळे महापालिकेने या गोशाळांवर कारवाई करावी अशी मागणी सत्येन पुरी यांनी केली आहे .


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# आनंदाची अक्षरे

कोणी हळूच माझ्या वेणीला झोका करीत, कोणी गजरा देत, किती निरागस लडीवाळपणा; रोज अशा हसऱ्या उमलत्या कळ्या मन आनंदाने भरून टाकत. असा आनंदठेवा तीस वर्षे मिळाला. पहाटेपासून केरवारे, सडारांगोळी, बागेला पाणी.. कामांच्या गर्दीत पाय जमिनीला न टेकता नुसती धावपळ! स्वयंपाक, मुलांचे डबे, घरातील ज्येष्ठांची काळजी या सगळ्या कसोट्या पार करून शाळेतील नोकरीवर हजर होण्यासाठी हा आटापिटा! शाळेच्या प्रवेशद्वाराशी येताच, 'बाई आल्या! बाई आल्या!' या स्वागताने सकाळच्या धावपळीची जागा आनंदाने घेतली. आईबरोबर आलेली मुले तिचा हात सोडून माझ्याभोवती गोळा होत. कोणी हळूच माझ्या वेणीला झोका करीत, कोणी गजरा देत, किती निरागस लडीवाळपणा; रोज अशा हसऱ्या उमलत्या कळ्या मन आनंदाने भरून टाकत. असा आनंदठेवा तीस वर्षे मिळाला. आता निवृत्तीनंतर हे सगळं थांबणार म्हणून थोडी उदास झाले होते पण.मी मुक्त झाले आणि नातीच्या आगमनाने आनंदाचा ठेवा परत मिळाला. नातीच्या बालक्रीडेत वय विसरून तिच्या संगे लपाछपी, लंगडी खेळताना खूप मजा केली. तिच्यासाठी सातारचे वास्तव्य सोडून पुण्यात यावे लागले. तिला रोज नवी गोष्ट तयार करून सांगताना मेंदूला चालना मिळाली.

काही तरी नवीन शिकण्याची इच्छा होती. आता नातही मोठी झाली. आमच्या वृंदावन सोसायटीत श्री गोपालकृष्ण मंदिरात गीतासंथा वर्गास जाऊ लागले. माझ्या भाग्याने मला माधवी जोशी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्कृत उच्चार चुकत. पण गुरूमाऊली ते शुद्ध करून घेत. त्यामुळे विद्यार्थीदशा अनुभवली. श्लोकाचे अर्थविवरण तर पुन्हा पुन्हा ऐकावे असे. रोजच्या गीतापठणाने आत्मविश्वास मिळाला. गीता शतकोत्सव महायज्ञात सहभागी होण्याचा आनंद घेतला. गीता शिकले याचे समाधान मिळाले. घरातील संकटप्रसंगी भगवंतावर भार टाकून संकटातून मुक्त होता आले. ताई आम्हाला अध्यात्मज्ञानाचे बोधामृत देतात. उपनिषदांविषयी अज्ञान होते पण ताईंनी अर्थ सोपा करून सांगितला. त्यामुळे, आवड निर्माण झाली. आद्य शंकराचार्यांचे चरित्र इतके छान सांगितले की ते परत परत श्रवण करावेसे वाटते.समर्पणातही आनंद असतो. निसर्गात पहा वृक्ष फळाफुलांनी डवरतात. सृष्टीचं सौंदर्य वाढवतात. आणि पूर्ण उमललेली फुले, परिपक्व फळं पृथ्वीला अर्पण करतात. कारण पुन्हा बहरायचं असतं. पृथ्वी मातेसारखा सगळा भार सोसते. तिच्यावर किती इमारती, धरणं, बोगदे, मोठमोठी यंत्रसामग्री, किती यादी सांगावी पण हा सगळा भार ती मातेच्या ममतेने पेलते. आपल्याला अन्नधान्य देऊन पोषण करते. सगळ्यांना आनंद देते. माता उदरात वाढणाऱ्या नवांकुराला जपते. तिला आई होण्याचा आनंद घ्यायचा असतो. पण गर्भ राहिल्यापासून किती तपासण्या, किती औषधं सेवन करते. बाळ जन्मताना होणाऱ्या वेदना सहन करते. बाळाचा जन्म होताच त्याच्या कोमल स्पर्शाने सगळे विसरते. त्याला वाढवताना प्रेमाची पाखर उदंड देते. पण मूल कितीही मोठे झाले तरी सोसलेल्या वेदनांचा उच्चार कधी करत नाही. अगदी पृथ्वीसारखेच समर्पणात आनंद मानते.पुण्यात आल्यावर 'आपले कोणी ओळखीचे नाही! कसे होणार?' असे वाटे. पण आईने अनमोल मंत्र दिला होता. तो आठवला. विवाह झाल्यावर सासरी येताना तिनं सांगितलं, 'तू तुझी माणसं सांभाळ.' आणि खरंच याची प्रचिती आयुष्यभर घेत आहे. सासर-माहेरची माणसं प्रेमाने सांभाळली आणि त्यांच्याकडून भरभरून प्रेमानंद घेतला.पुण्यात आले. काही काळाने एका विषयावर लेख लिहिण्याची स्पर्धा होती. सकाळी दीपाने स्पर्धे साठी 'आई तुम्ही लिहा..' असे सांगितले. त्याच दिवशी दुपारी लेख द्यायचा होता. प्रयत्न केला. बरेच लेख आले होते. लगेच निकाल जाहीर होणार होता. त्याच सभागृहात एक कार्यक्रम होता. तो संपला आणि परीक्षकांनी निकाल जाहीर केला. मला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले. माझा विश्वासच बसेना. पण खरेच मला गिफ्ट व्हाउचर मिळाले. आणि पुणेकरांनी मला आपली म्हटले, याचा आनंद झाला.आमच्या सोसायटीत उपाध्ये गुरुजी यांच्या प्रेरणेने 'गुलमोहर' हस्तलिखित अंक गेली नऊ वर्षे दरमहा प्रसिद्ध होतो. त्यामुळे संगणक असाक्षरांना मनातील विचार हाताने लिहिण्याचा आनंद लुटता येतो. त्याचे काही काम माझे पती अरविंद लिमये पाहात. त्यामुळे मला त्यात सहभागी होता आले. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकांनी वेगवेगळे विषय देऊन सामान्य वाचकांना आमचे लेख प्रकाशित करून लिहिते केले. आमचा 'एव्हरग्रीन' कट्टा मला लेखन प्रेरणा देतो. माझ्या मावशी नलिनी जोहरे या लिहिण्यास प्रोत्साहन देतात. लेख संपविण्यापूर्वी एक सांगावेसे वाटते. या यांत्रिकयुगात आपल्याला मन मोकळे करायला एकच साधन- 'लेखन'! लिहा आणि आनंदी रहा.

# लातूरची येळवस... अन वलग्या वलग्या सालन पलग्या

लातूर जिल्हा आणि जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात उद्या गुरुवारी , दि. ११ जानेवारी रोजी समुद्राला जशी, पाण्याची भरती येते... तशी शेताशेतात माणसाची, भरती येते... कोणत्याही पुरानात किंवा इतिहासात नसलेला मात्र शेकडो वर्षाची परंपरा असलेला एक सण म्हणजे येळवस म्हणजे वेळाआमावस्या...हा सण हिरवाईचा अपूर्व सोहळा...११ जानेवारी रोजी अख्ख्या लातूर जिल्ह्यातील शेतात भरेल, यावेळी कोरोनाचे संकटही नाही , जिल्हा प्रशासनाने सार्वजनिक सुट्टीही जाहीर केली आहे. त्यामुळे ही वेळामावस्या मोठ्या धुमधडक्यात साजरी होणार आहे...त्या विषयी महाराष्ट्राला समजावे म्हणून हा लेख प्रपंच...!!

कसा असतो सोहळा!!वेळाआमावस्या चार दिवस अगोदर साधनाची जमवा-जमव सुरु होते. त्यात तुरीच्या शेंगा, चवळी,भुईमूग हा सगळा रानमेवा जमा होतो...आणि वेळाआमावस्या पहाटे घराघरात चूल पेटते... बेसनपिठात कालवून चिंच आणि अंबिवलेल्या ताकाच्या पाण्यात वर उल्लेखलेले उकडलेले पदार्थासह शिजवलेली भाजी... म्हणजे भज्जी... ही भज्जी म्हणजे अफलातून भाजी, मी आजपर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यात फिरलो, वेगवेगळे पदार्थ खाले पण भज्जीसारखी अफलातून चव कशाला म्हणजे कशाला नाही ...या डीशची तुलना कोणतेही पंचतारंकित हॉटेलही करु शकणार नाही.... या बरोबर दिले जाणारे अंबील म्हणजे तर राज दरबारी असलेले सगळे पेय फिके पडावेत असे...चार दिवसाचे ताक ज्वारीच्या पिठात अंबवून जिरा फोडणी दिलेल हे पेय जे तांब्यावर तांबे रिचवले तरी प्यायची इच्छा होते ते अंबिल ( काही जणांचे तोंडही सुजतात दुस-या दिवशी जादाचा डोस झाल्यामुळे ). भल्या थोरल्या भाकरी...... गव्हाची खीर एका शेतात २० ते २५ लोक जेवतील एवढा स्वयंपाक वाजत गाजत घरातून डोक्यावरुन शेतावर निघतो. एका शेतात खाल्लेली येळवस दुसऱ्या शेतात जाऊन खाण्यासाठी ते जिरावं म्हणून प्रत्येक कोपीच्या पुढे झोका बांधला जातो...!!काय आहे परंपरा

अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो.भारतीय संस्कृती ही प्रामुख्याने कृषी संस्कृती आहे. सर्व प्राणिमात्रांची मूलभूत गरज म्हणजे अन्न. त्यामुळे मानवी जीवनात अन्न-धान्याचे महत्त्व अविवाद्य असल्याने आपल्या पूर्वजांनी त्यासंबंधी विशेष विचार केलेला आढळून येतो.

भारतीय व्दिपकल्पात सिंधु संस्कृती पासून नदीचे जल पुजन करण्याची परंपरा चालत आलेली आहे. गंगा ,यमुना , गोदावरी , सरस्वती ,नर्मदा ,सिंधु आणि कावेरी या त्या सात नद्या ( सप्त सिंधु ) भारतीय लोक परंपरेत अतिशय पवित्र समजल्या जातात. त्यामागे त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता होती. त्याच सप्तसिंदु मातृका म्हणून पुजण्याची परंपरा सुरु झाली. पुढे पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खोदल्यानंतर त्यातले जल हे या सप्त सिंधुचे प्रतिक म्हणून पुजल्या जावू लागले. विहिरीच्या जवळ प्रतिकात्मक सात दगड पुजण्याची परंपरा आहे तीला लातूर जिल्ह्यात आसरा म्हणून ओळखले जाते. आसरा म्हणजे तुच आमची राखण करणारी, सहारा देणारी ,पाणी पाजणारी. याच आसराची पुजा वेळा आमवस्येच्या दिवशी प्रत्येक शेतात मस्त ज्वारीच्या कडब्याच्या पेड्यांची कोप करुन मनोभावे पूजा करून लक्ष्मीला ब्लाऊज पीसने ओटी भरून नैवेद्य दाखवला जातो. परंपरा म्हणून खोपेला ५ फेऱ्या मारतात आणि वलग्या वलग्या सालम पलग्या असे म्हटले जाते. हे कन्नड वाक्य आहे. कन्नडात वलगे वलगे सालन पलगे असा उच्चार होतो. त्याचा अचूक अर्थ वांग्याची भाजी आणि पोळी तुम्हाला(लक्ष्मीला) अर्पण करतो. तुम्ही आमच्यावर वर अनुग्रह करा. असा होतो.

सकाळी पूजाकरुन आणि हा सगळा सुग्रास भोजनाचा भोज चढवून मोठी पंगत बसते..... जेवण करताना आपण किती खातोय याचे भान राहत नाही. प्रत्येकाच्या कोपीला जावून भज्जीचा अस्वाद घेण्याचा आग्रह होतो, तो टाळता येत नाही, पोटाला तडन लागते. जेवणाच्या पात्रावरुन उठून झोक्यावर जावून झोका खेळायचे खालेले अन्न पचवण्यासाठीचा प्रयत्न करायचा.. आणि पुन्हा दुसऱ्या कोपीवर जाऊन जेवायचे...

एकेकाळी १२ बलुतेदार ,आठरा आलुतेदार यांनाही आग्रहाने जेवायला बोलवून हे सगळे खावू घातलं जात.

संध्याकाळी ज्वारीच्या पेंडीचा टेंबा करुन रब्बीचा गहू, हरभरा याच्या वावराला तो पेटवून रान ओवाळून काढायचे, आणि तोच टेंबा मिरवत जावून गावातील मंदिराच्या समोर टाकायचा मोठी आग करुन ती शमली की तीच्या राखेतून विस्तव असतानाच ती ठोकरुन घरी जायचे. असा मनमोहक सण आहे. त्यानंतर घरातले कर्ते पुरुष माळेगावच्या खंडोबाच्या जत्रेला निघून जायचे..... ही जत्रा देशभरात वेगवेगळ्या कारणासाठी प्रसिद्ध आहे. मोठा घोड्याचा बाजार ( माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांच्या सह अनेकांचे दैवत ), गाढवांचा बाजार, सगळ्या भटक्या जमातींची पंचायत यावेळी इथे भरते. देशभरातले तृतीयपंथी दर्शनाला येतात (तृतीयपंथांचे माळेगाव अशीही ओळख ) ,तमाशाचे मोठ मोठे फड..... यामुळे या जत्रेला पुरुष मंडळीच्या दृष्टीने ख-या अर्थाने चांगभलं असे .....



असा हा सण आणि त्याची परंपरा आहे आजही मोठे हौसेनी सांभाळली जाते... चला तर मग येळवस साजरी करू या.. महान परंपरेचा वारसा जपू या...!!

**************

**युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# न्यायदेवता सदैव जागीच!

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी गुजरातमधील दंगलीत सामूहिक बलात्काराची बळी ठरलेल्या बिल्किस बानो यांना न्याय दिला आहे. या प्रकरणातील ११ आरोपींची शिक्षा माफ करत तुरुंगातून सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला होता. याविरोधात बिल्किस बानो यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. यावर गुजरात सरकारचा निर्णय रद्द करत सुप्रीम कोर्टाने सर्व ११ आरोपींना दोन आठवड्यांत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. गुजरात सरकारला हा मोठा दणका मानला जात आहे. २००२ च्या गुजरात दंगलीत पाच महिन्यांची गर्भवती असलेल्या बिल्किस बानो यांच्यावर ११ आरोपींनी सामूहिक बलात्कार केला होता आणि त्यांच्या डोळ्यासमोर त्यांच्या कुटुंबातील सात जणांची निर्घृण हत्या केली होती. मात्र, गतवर्षी यातील काही आरोपींची उर्वरित शिक्षा माफ करून त्यांची सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला होता. या निर्णयाविरोधात बिल्किस बानो यांनी सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती.

सोमवारी या प्रकरणी न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने आपला निकाल दिला आहे. खंडपीठाने या खटल्याचा निकाल देताना गुजरात सरकारला चांगलेच फटकारले आहे. हा गुन्हा गुजरातमध्ये घडला असला तरी महाराष्ट्रात या प्रकरणी आरोपींवर खटला चालून त्यांना शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे गुजरात सरकारला आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकारच नाही. या प्रकरणात निर्णय घेण्याचा अधिकार महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळेच गुजरात सरकारने ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा घेतलेला निर्णय रद्द ठरवला जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने पुढील आदेश देताना म्हटले आहे की, दोषींच्या सुटकेनंतर त्यांचा स्वातंत्र्याचा अधिकार अबाधित राहण्याची मागणी गैरलागू आहे. कारण समानतेच्या वातावरणातच स्वातंत्र्याच्या अधिकाराचा विचार होऊ शकतो.

दोषींप्रमाणेच पीडितांच्याही अधिकारांचा न्यायालयाला विचार करणे क्रमप्राप्त आहे. समानतेशिवाय कायद्याचे राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. अशा प्रकारे गुन्ह्याच्या परिणामांपासून गुन्हेगारांना मोकळीक देणे समाजातील शांततेला चूड लावण्यासारखे होऊ शकेल. त्यामुळे सर्व ११ गुन्हेगारांनी येत्या दोन आठवड्यांत पोलिसांना शरण यावे, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने आपल्या निकालात दिले आहेत. त्याचबरोबर गुन्हेगारांना पुन्हा शिक्षा माफीसाठी प्रयत्न करायचे असतील तर, त्यासाठी त्यांनी आधी शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात असणे गरजेचे आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. या खटल्यात जन्मठेपेची शिक्षा झालेला एक आरोपी राधेश्याम शहा याला मुंबईच्या सीबीआय न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. शिक्षेची १५ वर्षे पूर्ण केल्याचा हवाला देत त्याने तुरुंगातून सुटकेची मागणी केली होती. सुप्रीम कोर्टाने गुजरात सरकारला यावर विचार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, गुजरात सरकारने २०२२ मध्ये सर्व ११ आरोपींची शिक्षा माफ करून त्यांची सुटका केली होती.

खंडपीठाच्या निर्णयामुळे आम्हाला न्याय मिळाला आहे. परंतु हा अंतिम विजय नाही अशी प्रतिक्रिया बिल्किसच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. सुप्रीम आदेशामुळे न्यायव्यवस्थेवर आमचा पुन्हा एकदा विश्वास बसला आहे, न्याय अजूनही जिवंत असल्याची खात्री पटली आहे. परंतु दोषी इतर राज्यातून माफीसाठी अर्ज करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आम्हाला हा अंतिम विजय वाटत नाही अशी प्रतिक्रिया बिल्किस यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली. दोषी असलेल्या ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला असला तरी हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरविला. सत्ताधा-यांनी मनमानी करून आपल्याला हवे तसे निर्णय घेतले तरी त्या निर्णयांना लगाम घालणारी, त्या निर्णयाची चिरफाड करणारी न्यायपालिका आपल्या देशामध्ये उत्तम प्रकारे कार्य करीत आहे, हे या निकालाने दाखवून दिले आहे. बिल्किस बानो बलात्कार प्रकरणी या ११ जणांना शिक्षा झाली होती. खरे म्हणजे त्यांनी मानवतेला काळिमा फासणारे कृत्य केले होते.त्यांना जन्मठेपही झाली होती तरीसुद्धा झाली एवढी शिक्षा पुरे झाली, असा विचार करून गुजरात सरकारने त्यांची शिक्षा माफ केली. गुजरातमध्ये २०२२ ला झालेल्या निवडणुकांच्या आधी काही महिने त्यांची मुक्तता करण्यात आली. मुक्तताच झाली नाही तर त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला, पेढेही भरवले गेले. त्या ११ जणांच्या सुटकेविरुद्ध ३० नोव्हेंबर २०२२ रोजी बिल्किस यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावरील सुनावणीनंतर सुप्रीम कोर्टाने १२ ऑक्टोबर २०२३ रोजी आपला निकाल राखून ठेवला होता. अखेर ८ जानेवारी २०२४ रोजी न्यायालयाने मुदतपूर्व शिक्षामाफीचा निर्णय रद्द केला. मुदतपूर्व शिक्षामाफीबद्दल खंडपीठाने गुजरात सरकारला तर जबाबदार धरलेच शिवाय ११ पैकी एका आरोपीने माफीसाठी केलेल्या याचिकेवर राज्याने निर्णय घ्यावा असा जो आदेश उच्च न्यायालयाने दिला होता तोही चुकीचा ठरवला. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर विविध विरोधी पक्षाच्या नेत्यांनी गुजरात सरकार, केंद्र सरकार आणि भाजपवर टीकेची झोड उठवली. या निकालाने भाजपचा महिलांविरोधी चेहरा उघड झाला, गुन्हेगारांना संरक्षण कोण देत आहे हे स्पष्ट झाले, अशा प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

२००२ मध्ये गुजरातेत झालेल्या दंगली आणि नरसंहारामुळे देश हादरला होता. बिल्किस बानोवरील अत्याचार तर कोणत्याही संवेदनशील माणसाला शरमेने मान खाली घालायला लावणारा होता. एकूणच हे प्रकरण माणुसकीला काळिमा फासणारे होते शिवाय राजकारणाच्या हीन पातळीचे दर्शन घडविणारे होते. बिल्किस कोणत्या जाती-धर्माची होती ते महत्त्वाचे नव्हते तर ती एक महिला आहे आणि तिच्यावर अत्याचार झाला आहे ही बाब समाजाने आणि सरकारने लक्षात घेणे आवश्यक होते. नुसते महिलांचा सन्मान केला पाहिजे असे म्हणण्याने काय होते? बिल्किस बानो प्रकरणात गुजरात सरकारने सुरुवातीपासूनच पक्षपातीपणा केला यात शंका नाही. बिल्किस बानो या लढ्यात हार न मानता जोमाने उभी राहिली आणि अखेर न्याय मिळवलाच. तिच्या जिद्दीला सलाम! 'सर्वोच्च' निकाल पाहता न्यायदेवतेने डोळ्यांवर पट्टी बांधलेली असली तरी ती सदैव जागी असल्याचेच स्पष्ट झाले आहे.




# शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक भीमा कोरेगांवचा जयस्तंभ या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १ जानेवारी ला भीमा कोरेगाव येथील जयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी का जात होते? हे समजून घेणे आवश्यक आहे. करिता ३१ डिसेंबर २०२३ ला शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक भीमा कोरेगांवचा जयस्तंभ. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, (औरंगाबाद), महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन इंजिनिअर मुकुल निकाळजे यांनी केले. ते म्हणाले की, सातवाहन साम्राज्याची राजधानी पैठण होती. महारठ्ठा पासून महार हा शब्द तयार झाला आहे. नाशिकच्या लेनीत नागनिकेचे शिल्प सापडले आहे, जी महारठ्ठीची कन्या होती. महारांकडे गांव सांभाळण्याची जबाबदारी होती. गुप्तहेर खाते महारांकडे होते. महारांनी मरण पत्करुन संभाजीराजे यांचा अंत्यविधी केला. शिदनाक महारांनी आपले सैन्य इंग्रजासोबत लढविले ज्यात ते यशस्वी झाले. परिणामी पेशव्यांनी शरणागती पत्करली. ही बाब इंग्रजांसाठी फारच महत्त्वपूर्ण होती. पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्रजांना महारांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली आहे. दुसऱ्या महायुद्धात सुद्धा हिटलरशी लढताना महारांनी आपली फार मोलाची भूमिका पार पाडली आहे. जाती नष्ट झाल्याशिवाय आपला देश राष्ट्र होऊ शकत नाही, त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

या प्रसंगी टी. एन. थोरात म्हणाले की, भीमा कोरेगांवच्या लढाईत ५०० महारांनी २८,००० पेशव्यांचा पराभव केला ही बाब निश्चितच शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक आहे. १ जानेवारी १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः मानवंदनेसाठी गेले होते. तिथे मार्गदर्शन करतांना त्यांनी म्हटले की, तुम्ही शूर वीरांची संतान आहात, ही गोष्ट काल्पनिक नव्हे! तर भीमा कोरेगांव ला जाऊन बघा तुमच्या पूर्वजांची नांवे तेथील जयस्तंभावर कोरलेली आहेत. तो पुरावा आहे की, तुम्ही भेड बकरीची संतान नसून सिंहाचे छावे आहात. एड. विलास रामटेके म्हणाले की, भीमा कोरेगांवची लढाई इस्ट इंडिया कंपनीचे कॅप्टन स्टाटन यांचे नेतृत्वाखाली लढली जात होती. त्या शौर्याचे प्रतीक म्हणून २६ मार्च १८२१ ला जयस्तंभ उभारण्यात आला आहे. महार लोकच लढवय्ये होते याची जाणीव असल्याने १५ डिसेंबर २०१८ ला मुंबई येथील गेट वे ऑफ इंडिया समोर महार बटालियन च्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला होता. या देशात समता आणि विषमता हे दोन मुख्य प्रवाह आहेत. जे परस्परांशी सातत्याने संघर्ष करीत असतात. साधू आनंद म्हणाले की, भीमा कोरेगांव या युद्धाविषयी आपण केवळ ऐकले आहे करिता आपण वास्तविकता समजून घेतली पाहिजे. एड. प्रवीण जाधव म्हणाले की, १९९८ ते २००१ पर्यंत पुण्यात राहायला होतो पण याची जाणीव नव्हती. मात्र १ जानेवारी २०१८ ला दंगल झाली आणि महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील जनतेला जाणीव झाली. ज्यामुळे अनेक व्यक्ती तिथे दरवर्षी जायला लागलेत. चळवळीला मरगळ आलेली आहे ती मरगळ दूर करण्यासाठी अशा प्रबोधनात्मक कार्याची नितांत आवश्यकता आहे. ज्यामुळे सुप्तावस्थेतून बाहेर पडायला संधी प्राप्त होईल. समाजाची दशा आणि दिशा यावर आपण विचार मंथन केले पाहिजे. करिता वाईटाला दूर लोटण्यासाठी व्यवस्थेच्या विरोधात बोलने आवश्यक आहे. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते की, जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा कि, आपणाला या देशाची शासनकर्ती जमात व्हायची आहे. पूर्ण हयात खर्च केल्यावर सुद्धा आपण जिथे होतो तिथेच असल्याचे दिसून येते, याची मिमांसा होणें आवश्यक आहे. करिता वैचारिक पायाभरणी अशा प्रकारच्या कार्यशाळेतच होऊ शकते. धनराज गोंडाने म्हणाले की, धर्म एकट्याच्या कल्याणासाठीच कटिबद्ध आहे तर धम्म हा बहुजनांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहे, ज्याला सीमा नाही. जनसामान्यांचे प्रबोधन करने हे फार महान कार्य आहे, जे या वैचारिक कार्यशाळेतून पार पाडले जात आहे.



प्रमुख वक्ते समाधान इंगळे म्हणाले की, जातीजातीत विवाह संस्था कटिबद्ध असल्याने आपण आपल्याच जातीत मश्गुल आहोत. करिता जातीबाहेर विवाह करण्याची प्रक्रिया प्रकर्षाने राबविली पाहिजे जेणेकरून जाती विहीन समाज निर्माण व्हायला सहकार्य मिळेल. हे एकमेव युद्ध आहे ज्याच्या शौर्याचे प्रतीक जयस्तंभ उभा आहे. संघामध्ये जीवंतपणा आहे तो केवळ धम्मामुळेच होय.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, एक काळ असा होता जेव्हा मनुस्मृती प्रमाणे चातुर्वर्ण्य व्यवस्थेची अंमलबजावणी केली जात असताना शूद्रांचे माणूसपण नाकारण्यात आले होते. महारांना ९ ते ३ च्या काळात दिवसा फिरू दिले जात नसे कारण त्यांच्या सावलीचा विटाळ होत असे. पावलांचे ठसे मिटविण्यासाठी ढुंगणाला झाडू आणि थुंकण्यासाठी गळ्यात मडके अडकविले जात होते. याची नोंद डॉ. घुर्ये यांनी घेतली आहे. तर डॉ. द. पु. खानापूरकर असे म्हणतात की, महाराष्ट्र हे नांव सुद्धा महार या नावावरूनच पडले असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या खंड क्रमांक १९ मधील परिशिष्ट क्रमांक ८ मध्ये पेशवाई आणि परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये कोरेगांव चा जयस्तंभ यावर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मार्मिक विवेचन मांडलेले आहे. २०१८ ला दंगल उसळल्यानंतर जातीय सलोखा कायम राहावा म्हणून बामसेफ मार्फत महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात मूलनिवासी एकजूट परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात विविध जातीतील संघटनांना सामावून घेण्यात आले होते. ज्यामुळे जातीय सलोखा कायम टिकून राहण्यास मदत झाली. परिणामी परस्परातील दुरावा कमी करण्यास फार मोलाची मदत झाली. करिता समाज जीवनात आजही मूलनिवासी बहुजन एकजूट परिषदांचे सातत्याने आयोजन करण्याची नितांत आवश्यकता आहे. मूलनिवासी बहुजन समाजातील नेतृत्वाची सत्ता स्थापित करण्यासाठी गैर राजनीतिक मुळे मजबूत करण्याची गरज आहे. अशाप्रकारे गळ्यातील मडके व ढुंगणाचा झाडू काढून टाकण्यासाठी महार पेशव्यांच्या बाजूने लढायला तयार होते पण ही अट पेशव्यांनी नाकारली परिणामी महार इंग्रजांच्या बाजूने पेशव्यांच्या विरोधात लढले आणि २८,००० पेशव्यांचा ५०० महारांनी पराभव केला. म्हणजे सरासरी एक महार छप्पन पेशव्यांबरोबर लढला असे म्हटले पाहिजे. यातूनच तुझ्या सारखे छप्पन पाहिले! ही म्हण रुढ झाली. इंग्रजासाठी हे युद्ध जिंकणे फार महत्त्वाचे होते, ज्याला महारांचे सहकार्य लाभले ही उल्लेखनीय बाब असल्याने त्यांनी जयस्तंभाची २६ मार्च १८२१ ला उभारणी करण्यास सुरुवात केली ते १८२२ मध्ये पूर्ण झाले. ज्यावर पूर्व-पश्चिम बाजूला इंग्रजी व मराठीत शहीद झालेल्या वीर सैनिकांची नावे कोरलेली आहेत. ज्यामध्ये २२ महार, १६ मराठा, ८ राजपूत व इतर हिंदू, दोन मुस्लिम व एका ख्रिश्चन सैनिकांचा समावेश आहे. अशा प्रकारे विविध जाती समुहातील सैनिक लढाईत सहीद झाले ज्यात बहुतांश महार होते ही बाब उल्लेखनीय होय.

कार्यशाळेला एड. विलास रामटेके, टी. एन. थोरात, साधू आनंद, समाधान ओंकार इंगळे, राजू कांबळे, मुकुल निकाळजे, धनराज गोंडाने, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# सार्या जगामधे बौद्ध धम्म हा सर्वश्रेष्ठ धम्म आहे - डॉ. भिमराव आंबेडकर

## उलवे, नवी मुंबई बौद्ध धम्म परिषदेस जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नवी मुंबई / के. एच. हनवते :- बौद्ध धम्मामुळेच सार्या विश्वात भारत महान देश बनेल..!, मी सारा भारत बौद्धमय करीन..! राष्ट्रनिर्माते : प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संकल्प केला होता. या संकल्पनेतून प्रथमच उलवे नवी मुंबई येथे भव्यदिव्य बौद्ध धम्म परिषद दिनांक : ७ जानेवारी २०२४ रोजी संविधान चौक येथे हजारोंच्या संख्येत संपन्न झाला. या परिषदेला दि. बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व बौध्द-आंबेडकरी समाजाला संबोधीत करताना भिमराव यशवंत आंबेडकर म्हणाले की, सार्या जगामध्ये बौद्ध धम्म हाच सर्वश्रेष्ठ धम्म आहे. आणि या धम्मा पुढे अनेक आव्हाने आहेत परंतु आपण जर एकत्र राहिलो, एकत्र आलो तर आनेक अव्हाने आपण परतून लावू शकतो आणि जगाच्या पाठीवर बुद्धांचा धम्म किती ? आदर्श आहे हे आपण पुन्हा स्पष्ट करू शकतो, सर्व उपस्थितांना संबोधित करताना डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांनी वरील उदगार काढले. ते पुढे आसेही म्हणाले की, आज घडीला आपले संविधान सुरक्षित ठेवण्यासाठी, त्याची रक्षा करण्यासाठी संपूर्ण देशातील बौद्ध - आंबेडकरी समाजाने अता एक संघ होणे ही काळाची नितांत गरज आहे आसे ही म्हणाले. या बौद्ध धम्म परिषदेचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून डॉ. एस. आर. इंदवंस महाथेरो यांची विशेष उपस्थिती होती डॉ. इंदवंस महाथेरो यांनी सर्व उपस्थित उपासक, उपासिका यांना आपली धम्म देसना देताना म्हणाले की, बुद्धाचा धम्म हा मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठी आदर्श बौद्ध धम्म आहे तो समजून घेतल्यास आपण आपले जीवन सुखी करू शकतो. या बौद्ध धम्म परिषदेला देश विदेशातील भिक्खुसंघ व भिक्खुणी संघासह देशभरातून बौद्ध - आंबेडकर अनुयायी हजारोंच्या संख्येत उपस्थित होते. या धम्म परिषदेषाठी उलवे धम्म परिषद कोअर कमिटी यांनी गेल्या दोन महीण्यापासुन आतोनात परिश्रम घेतल्याने हि धम्म परिषद यशस्वी झाली. वामनदादा वाघमारे (अध्यक्ष), सचिन गवळे, अरुण झनकार, अरूण गायकवाड, प्रा.भोसले, एन. एम. इंगळे, प्रभाकर भारसाकळे, वनिता कांबळे (सचिव), अमोल दहिवले, सचिन उघडे, मिथुन कांबळे, आयु. बाबुराव इंगळे, यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली तर सुत्रसंचालन आयु. विश्वकांत लोकरे यांनी केले. या बौद्ध धम्म परिषदे साठी नवी मुंबईतील बौध्द उपासक, उपासीका आदी कार्यकर्त्यांनी बौद्धधम्म परिषद यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मोलाचे सहाय्य केले व हि धम्म परिषद सफलता पूर्वक पार पाडली त्याबद्दल सर्वांचे मनःपुर्वक जाहीर अभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.







## केस रोज गळून शेपटीसारखे झाले? बदाम तेलात मिसळा 'हे' दोन पदार्थ; केस होतील घनदाट काळे अन् लांबसडक!



केस रोज गळून शेपटीसारखे झाले? बदाम तेलात मिसळा 'हे' दोन पदार्थ, केस होतील घनदाट काळे अन् लांबसडक केस निरोगी आणि चमकदार असावेत, अशी प्रत्येकाची इच्छा असते. मात्र, बदलत्या वातावरणामुळे अनेकांना केसांसंबंधित समस्यांना तोंड द्यावे लागतेय. त्यातही बहुतांश लोक केसगळतीच्या समस्येने त्रस्त आहेत. किती शॅम्पू बदलून, तेल वापरूनही फरक पडत नसल्याने आता केसांची काळजी घ्यायची तरी कशी, असा प्रश्न अनेकांना सतावतोय. रोज होणाऱ्या केसगळतीमुळे अनेक महिला डोक्यावर फक्त शेपटीएवढेच केस शिल्लक राहिल्याचे सांगताना दिसतात. तर, काहींच्या केसांची वाढ खुंटली आहे. अशा परिस्थितीत केसांना निरोगी ठेवणे कठीण होऊन जाते. दरम्यान, निरोगी केसांसाठी बदाम तेल, मोहरीचे तेल, कढीपत्ता, मेथीचे दाणे यांच्यापासून घरच्या घरी तयार केलेले एक नैसर्गिक तेल फायदेशीर ठरत असल्याचे सांगितले जात आहे.

# नालासोपारा बुध्दभूमीत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची १९३ व्या जयंतीचा दैदिप्यमान सोहळा साजरा.

वसई :- नालासोपारा बुध्दभूमीत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची १९३ व्या जयंतीचा दैदिप्यमान सोहळा साजरा. विचार मंचावर बसलेल्या मान्यवर महिलांच्या आणि उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर असलेले तेज ही क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची देणं आहे - प्रा.आशालतताई कांबळे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सव सेवा संस्था (रजि) वसई तालुका या संस्थेच्या माध्यमातून रविवार दिनांक ७ जानेवारी २०२४ रोजी स्त्री शिक्षणाची जननी अर्थात देशातील प्रथम महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची १९३ वी जयंती लॉर्ड बुध्दा कल्चरल सेंटर,बुध्दरुप प्रांगण,बुध्दभूमी,नालासोपारा पश्चिम येथे अतिशय उत्साहात माजी नगरसेविका आदरणीय हिराताई काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.सायंकाळी ५ ते ६.३० वाजेपर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून मुली-महिलांनी वेशभूषा,कविता आणि नेत्रदीपक नृत्य सादरीकरण करून आगळीवेगळी आदरांजली वाहिली जी शेकडो उपस्थित लोकांना नि:शब्द करणारी होती एवढेच नाही तर उपस्थित प्रमुख मार्गदर्शिका जेष्ठ साहित्यिका आदरणीय आशालतताई कांबळे यांना ही तोंडभरून स्तुती केल्याशिवाय राहता आले नाही त्या म्हणाल्या की सांस्कृतिक कार्यक्रमातून ही एक अनोखी आणि कौतुकास्पद पर्वणीच होती. मुख्य मार्गदर्शनातून आशालतताई यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या शैक्षणिक योगदान किती मौल्यवान होते आज विचार मंचावर बसण्याची ताकद ही कशी मिळाली हे अगदी सोप्या भाषेत समजावून देताना अगदी प्राचीन संस्कृतीचा इतिहास काय होता,१९ व्या शतकात फुले दांपत्याच्या योगदानामुळे कोणती संस्कृती निर्माण झाली आणि कपुढे संविधानिक संस्कृती याची उत्तम प्रकारे जोडणी केली आणि उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.आजच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते माननिय प्रिती रुपेश बेसेकर यांचा एकपात्री प्रयोग होय,मी सावित्री बोलते आणि तो तर कमालीचाच.सदर एकपात्री प्रयोग साधारणतः तासाभराचा होता,सुरूवातीपासूनच हा प्रयोगावर पक्कड कायम होती,संवाद,शारीरिक हालचाली,आवाजात आवश्यकतेनुसार चढ उतार इतकी कमालीची होती की उपस्थित जनसमुदाय आपल्या जागेवरून उठू शकला नाही.ज्योतिबांच्या निधनाचा प्रसंग साकारताना जवळपास सर्वच उपस्थितांचे डोळे पाणावले होते असे चित्र दिसत होते एवढ्या नेत्रदीपक अभिनयासाठी विचार मंचावर या अभिनेत्रींचे खुप खुप कौतुक झाले अर्थात ती त्यासाठी योग्यच होती. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना आम्ही सावित्रीच्या लेकी २०२४ या अंतर्गत जिल्हास्तरीय 'ज्ञानज्योती पुरस्कार' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्यामध्ये अतिशय रेखीव व सुबक सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र होते. विशेष म्हणजे सर्व क्षेत्रातील महिलांचा समावेश होतो प्रामुख्याने सफाई कामगार ते आयुक्तांपर्यतच्या महिलांचा समावेश होता. कार्यक्रमात सन्माननीय वसई विरार महानगरपालिकेच्या उप आयुक्त चारूशिला पंडीत यांचा ही ज्ञानज्योती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी त्यांना इथपर्यंत पोहचण्यासाठी लागलेला प्रवास आणि बरे वाईट अनुभव व्यक्त केले शिवाय तरुणांनी पुढे येणे ही काळाची गरज आहे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे एक विशेष म्हणजे सर्व बाबी म्हणजे स्वागत,प्रास्ताविक, निवेदन, सुत्रसंचलन आणि शेवटी आभार या केवळ महिलांनीच केले याचे कौतुक उपस्थित मान्यवरांनी केले.आदरणीय सुगंधा कलमकर, दर्शना पवार आणि ॲड.सृष्टी भाताणकर-पवार यांनी इतके प्रभावीपणे केले यांचा आत्मविश्वास इतका मोठा होता की पहिल्यांदा सुत्रसंचलन करतात याची जाणीव करून दिली नाही.मुख्य कार्यकारी मंडळाच्या सर्व पदाधिकारी यांनी पडद्यामागे राहून कार्यक्रमाची सर्व सुत्रे महिलांच्या ताब्यात दिली याचे विशेष कौतुक उपस्थित मान्यवरांनी केले.या कार्यक्रमात बहुतांशी महिला या नऊवारी साडीत होत्या त्यामुळेही या कार्यक्रमाची रंगत वेगळी होती.या कार्यक्रमासाठी विविध शाखा,संघटना आणि मंडळांचे सभासद आणि विभागातील बहुसंख्य लोक हजर होते प्रामुख्याने साहित्यिक संदीप महाडीक,कर्नल सिध्दार्थ बर्वे,माजी नगरसेविका रेश्मा जाधव,शबनम शेख, शुभांगी गायकवाड,निलिमा गायकवाड,शांताराम वाळिंजकर, वासुदेव गावडे,गणेश पाटील,अजय शेठ,नवनाथ पगारे,आयकर सह आयुक्त रूपेश बेसेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.शेवटी आभार प्रदर्शन केले आणि राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रम अध्यक्षांच्या अनुमतीने संपुष्टात आला.





# घरफोडीच्या गुन्ह्यातील २ आरोपींना, २ लाख रुपयाच्या मुद्देमालासह अटक. वरिष्ठाचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.




लातूर :– घरफोडीच्या गुन्ह्यातील २ आरोपींना, २ लाख रुपयाच्या मुद्देमालासह अटक. वरिष्ठाचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दी मध्ये राहते बंद घराचा कुलूप तोडून चोरीची घटना घडली होती. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस एमआयडीसी गु.र.नं ९४५/२०२३ कलम ४५४,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदरचा गुन्हा उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली. सदर माहितीची बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून बंद घराचे कुलूप तोडून चोरी करणारे आरोपींना निष्पन्न करून त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन आरोपी नामे शंभू विक्रम बुधवाडे, वय २२ वर्ष, राहणार पिंटू हॉटेलचे पाठीमागे,मळवटी रोड, लातूर, आकाश उर्फ भावड्या बाबुराव कांबळे, वय २४ वर्ष, राहणार सिद्धेश्वर नगर, मळवटी रोड, लातूर. यांना दिनांक ०८/०१/२०२४ रोजी त्यांचे राहते ठिकाणाहून ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी त्यांच्या आणखीन एक साथीदारासह मिळून सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांनी वर नमुद गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल पैकी ४० ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने एकूण २ लाख रुपयाचा मुद्देमाल हजर केल्याने वरील आरोपींना वर नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असून गुन्ह्यातील आणखीन एक फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी हे करीत आहेत. वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून बंद घराचे कुलूप तोडून मुद्देमाल चोरणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस अमलदार रियाज सौदागर, योगेश गायकवाड, राजेश कंचे, प्रदीप स्वामी, प्रदीप चोपणे, यांनी केली आहे.

# भाजपा सांस्कृतिक सेलच्या जिल्हाध्यक्षपदी अनिल भंडारे यांची निवड



किनवट /ता. प्र. ( शेख शौकत):– गत अनेक वर्षापासून सांस्कृतिक, संगीत क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय कार्य असलेले सर्व परिचित व भाजपा निष्ठावंत म्हणून ओळख असलेले पत्रकार अनिल भंडारे यांची पक्षनिष्ठा व सदर क्षेत्रात मोठा वाटा आहे. याची दखल घेत भाजपा नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर यांनी पक्षाचे नियुक्तीपत्र देऊन सांस्कृतिक सेलच्या अध्यक्षपदावर त्यांची वर्णी लावली आहे. सदर नियुक्तीपत्र आमदार भीमराव केराम यांचे हस्ते देण्यात आले. यावेळी सदर क्षेत्रात काम करत असताना पक्षनिष्ठा, पक्षाचे विचार, ध्येय धोरणासी बांधिलकी ठेवून पक्ष वाढीसाठी काम करीत राहणार असे मत भंडारे यांनी व्यक्त केले. यावेळी तालुकाध्यक्ष बालाजी आल्लेवार, भाजपा नेते अनिल तिरमनवार, शहराध्यक्ष श्रीनिवास नेमानिवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी तालुकाध्यक्ष संदीप केंद्रे, शहराध्यक्ष संतोष चनमनवार, माजी नगरसेवक शिवा आंधळे, बालाजी धोत्रे सहित अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल भाजपाचे वरिष्ठ नेते राघू मामा, साप्ताहिक वंजारी पुकारचे मुख्य संपादक दत्ता जायभाये,पत्रकार शेख शौकत मधुकर अन्नेलवार तसेच सर्व पत्रकार बांधवांनी अभिनंदन करून अनिल भंडारे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# देवधर बनसोडे यांचे पाचव्या दिवशीही बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषण सुरूच ीं प्रशासनाचे दुर्लक्ष-प्रकृती खालावली,आंबेडकर अनुयांयी अंदोलनाच्या पवित्र्यात

पानगांव / विष्णु आचार्य :– पानगांव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांनी स्वतःचे दारुचे दुकाने सरकार जमा करून चैत्यस्मारकाचा हिशोब सार्वजनिक करावा या मागणी करिता देवधर बनसोडे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी कलशा जवळ बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषणाला बसले असुन उपोषणाचा पाचवा दिवस उजाडला तरीही प्रशासनाने म्हणावी तशी दखल न घेतल्याने आंबेडकर अनुयांयी अंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे समजते.

महाराष्ट्रात मुंबई,वगळता केवळ मराठवाड्यातील पानगांव ता.रेणापुर जि.लातुर येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत.या पवित्र अस्थींना अभिवादन करण्या करिता दरवर्षी ६ डिसेंबर या त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मराठवाड्यासह सिमावर्ती आंध्रप्रदेश,तेलंगणा, कर्नाटक राज्यातुनही लांखो आंबेडकरी अनुयांचींची गर्दी उसळत असते.परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के. आचार्य माजी दारूबंदी अधिकारी यांचे पानगांवात दारूचे दुकाने आहेत. ज्या महामानवाने पंचशील व बावीस प्रतिज्ञा देवुन शिल पालन करण्यास शिकवीले त्या महामानवाचा आणि येथे येणाऱ्या प्रत्येक अनुयांयीचा अपमान होत आहे. सदरचे दारू दुकाने ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी ही चालुच रहातात.चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांनी आपले दारुचे दुकाने सरकारकडे जमा करावीत,चैत्य स्मारकाचा आजपर्यंतचा सर्व जमाखर्च हिशोब ताळेबंदसह सार्वजनिक करावा.म्हणजेच एक तर दारुचे दुकान चालवावीत किंवा चैत्यस्मारक विहार चालवावे




अ अशा मागणीचे निवेदन दि.२७ डिसेंबर रोजी लातुरचे जिल्हाधिकारी,लातुरचे पोलीस अधिक्षक, रेणापुरचे तहसीलदार यांना देवुन ४ जानेवारी पर्यंत मागण्यांचा विचार व्हावा अन्यथा (दि.५) पासून पानगांव येथे असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशा जवळ बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषणाला बसणार असल्याचे लेखी निवेदन दिले होते त्यानुसार त्यांनी शनिवार (दि.६ ) पासून उपोषणाला सुरवात केली असून आज उपोषणाचा पाचवा दिवस आहे.परंतु प्रशासनाकडून किंवा डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्टचे आणि ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांच्या कडून म्हणावी तशी दखल घेतली न गेल्याने बनसोडे यांची प्रकृती खालावली असून प्रशासनाविरुद्ध आंबेडकरी अनुयांयीमध्ये संतापाची भावना व्यक्त केली जात आहे उपोषणाची तात्काळ दखल न घेतल्यास आंबेडकरी अनुयायी अंदोलन करणार असल्याचे बोलले जात आहे.

# उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्याच्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण



उमरखेड / प्रतिनिधी :– खरीप हंगाम २०२३ ची अतिवृष्टीची अनुदानित रक्कम सरसकट सर्व शेतकरी बांधवांना मिळणे ,खरीप हंगाम २०२३ पीक विमा सरसकट शेतकऱ्यांना दयावा,जिल्हा पुरवठा विभागाकडून देण्यात आलेले २७ लक्ष ८१ हजार रक्कम शेतकरी प्राधान्य रेशन कार्ड धारकांना तात्काळ अदा करावे, ग्रामीण भागातील सर्व घरकुल योजनांची रक्कम कमीत कमी ३ लक्ष एवढी करावी,घरकुल बांधकामासाठी संबंधित लाभार्थीना गौण खनिज दंड वगळता मोफत रेती आणू दयावी, पिढ्यान पिढ्या कसण्यात असलेली भोगवटदार क्र २ ची जमीन भोगवटदार वर्ग १ मध्ये समाविष्ट करावी ,शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव वाढून देत कापूस सोयाबीन प्रति क्विंटल दहा हजार व ऊस प्रतिटन ३५०० एव्हढी भाववाढ करावी,ह्या आणि इतर विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा तथा एक शेतकरी नेतृत्व बबलू जाधव पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शेतकरी शेतकऱ्यांना न्याय हक्कासाठी विविध मागण्यांसाठी शेतकरी आमरण उपोषण करत आहे

# महात्मा बसवेश्वरमध्ये निवडणूक साक्षरता क्लब कार्याची आढावा बैठक संपन्न

लातूर दि. १० :– भारत निवडणूक आयोगाकडून नागरिकांमध्ये निवडणूक विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप कार्यक्रम राबवण्यात येतो. सदरील स्वीप कार्यक्रमांतर्गत विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता क्लबच्या माध्यमातून स्वीप उपक्रमाची अमलबजावणी करण्यात येते. महाविद्यालयातील युवा मतदार नोंदणी व मतदान जनजागृतीचे काम करण्यासाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, नोडल ऑफिसर डॉ. राजकुमार लखादिवे आणि कॅम्पस अँबेसिडर उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येऊन क्लबने केलेल्या कार्याचा नुकताच आढावा घेण्यात आला. यावेळी वर्षशिप अर्थ फाउंडेशन सह समन्वयक वैष्णवी मोरे आणि ऊई फाउंडेशनच्या



मृणाल भोसले यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी क्लब अध्यक्ष शिवानी मुकडे, उपाध्यक्ष अनिल मुंढे आणि सदस्य कुलकर्णी पूजा, वाघमारे आयुष, भूमकर नंदिनी, राजे अश्विनी, गायकवाड शुभांगी, गायकवाड साक्षी, कोकणे यश, मोरे समाधान, बुलबुले श्रद्धा, वाघमारे आयुष, पवार संदीप यांची उपस्थिती होती. यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनीही उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# एस एस टी महाविद्यालयाचा विद्यार्थी वैभव मोरे याने खो खो मध्ये स्पर्धेत मिळवला वीर अभिमन्यू पुरस्कार

उल्हासनगर / प्रतिनिधी : छत्तीसगड येथे झालेल्या कुमार व कुमारी गट राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाने दोन्ही गटात प्रथम स्थान पटकावले. यामध्ये उल्हासनगर येथील एस एस टी महाविद्यालयातील तेजस्वी पोखरकर आणि दिव्या गायकवाड यांनी मुलींमध्ये आणि वैभव मोरे यांनी मुलांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. यात महाराष्ट्र कडून आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत वैभव मोरे यांनी संपूर्ण भारतात मानाचा असा वीर अभिमन्यू पुरस्कार प्राप्त केला आहे उल्हासनगर येथील एस एस टी महाविद्यालयाचे विद्यार्थी तेजस्वी पोखरकर आणि दिव्या गायकवाड हे दोन्ही खेळाडू के एल ई डी ए व्ही कोपरखैरने या क्रीडा मंडळातून तसेच वैभव मोरे हा नावाजलेल्या विहंग क्रीडा मंडळाचा खेळाडू आहे. महाराष्ट्राचे मुख्य प्रशिक्षक म्हणून राष्ट्रीय खेळाडू प्रताप शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र संघाने प्रथम स्थान पटकावले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरस्वानी,आय क्यू ए सी समन्वयक डॉ.खुशबू पुरस्वानी, क्रीडाशिक्षक श्री राहुल अकुल , श्री पुष्कर पवार , क्रीडा मार्गदर्शक श्री प्रताप शेलार आणि विनायक मनसुख तसेच सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे जल्लोषात स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी निकषांची पूर्तता करावी –कृषी संचालक दिलीप झेंडे

लातूर, दि.१० (विमाका) : शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची पूर्तता केलेल्या शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ केंद्र शासन देत आहे. तसेच पी.एम. किसान योजनेच्या १६ वा हप्त्याचा लाभ जानेवारी महिन्याच्या शेवटी वितरित करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी नोंदणी करणे,ई– केवायसी करणे, बँक खाते आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा १६ वा हप्ता वितरणापूर्वी शेतकऱ्यांनी स्वत: करावयाची आहे. यासाठी पी. एम. किसान योजनेच्या निकषांच्या अधिन राहून शेतकऱ्यांनी आवश्यक बाबींची पुर्तता करून घ्यावी, असे आवाहन पूणे कृषी आयुक्तालयाचे, कृषी संचालक(विस्तार व प्रशिक्षण) दिलीप झेंडे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

पी.एम.किसान योजनेअंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती,पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) दोन हजार रूपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी सहा हजार रूपये लाभ देण्यात येत आहे. लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे ई–केवायसी केलेले शेतकरी कुटुंब या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. राज्याच्या भूमी अभिलेख नोंदीनुसार जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई–केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेता यावा यासाठी केंद्र शासनाने ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी राज्यातील पात्र शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजनेत समाविष्ट करण्यासाठी महसूल, ग्रामविकास व कृषी विभागांना या विशेष मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेमध्ये लाभार्थ्यांनी स्वयं नोंदणी व ई–केवायसीसाठी सर्व सामाईक सुविधा केंद्र तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांच्यामार्फत कार्यपूर्तता करावी. तसेच आवश्यकतेप्रमाणे पूर्तता करण्यासाठी गावच्या ग्रामस्तरीय नोडल अधिकारी, कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# व्ही .एस . पँथर संघटनेचे सस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांना ग्लोबल स्कॉलर फाउंडेशनचा राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार प्रदान.

लातूर :– लातूर जिल्ह्याच्या सामाजिक आणि पुरोगामी चळवळीत कार्यरत असलेले विनोद खटके यांना त्यांच्या कार्य कृतुत्वला सन्मान करत पुण्याच्या ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन कडून त्यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले...

पद्मश्री पुरस्कार प्राप्त सन्मानीय सुधारक ओळवे यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात ...






लातूर जिल्हा आणि आसपासच्या तालुक्यातून उल्लेखनीय कामगिरीची माहिती फाउंडेशन च्या सर्वेशनात घेण्यात आली होती... सामाजिक कार्य करणे, करोना काळात आणि इतर वेळी जन्मदिनी रक्तदान शिबिर घेणे, कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य पुरवणे,शालेय गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे, गरीब विद्यार्थ्यांना कमी शुल्कात प्रवेश मिळवून देणे,शासकीय हॉस्पिटल मदे नातेवाईकांना अन्न वाटप करणे,गरजू गरीब रुग्णांना लागेल ती मदत हॉस्पिटल मदे स्वतः जाऊन किंवा संघटने मार्फत करणे... सामाजिक सलोखा जिथे बिघडतो त्या ठिकाणी स्वतः जाऊन ते वाद संविधनिक पद्धतीने मिटवणे,काही महिन्यांपूर्वी लातूर शहरात निर्माण मुस्लिम खुरेशी बांधव आणि हिंदू बांधवा मदे झालेले अतिशय सेन्सिटिव्ह मुधा त्यांनी स्वतः मिटवला आणि सामाजिक सलोखा जपला... आणि सर्वात महत्वाचे सर्व धर्मीय (हिंदू,मुस्लिम,इसाई,बौद्ध)सामूहिक विवाह सोहळा दर वर्षी घेणे ज्यात नवं दांपत्यास घर संसार ला लागेल ते सर्व वस्तू ,मनी मंगळ सूत्र ,कपडे सर्व स्वखर्चातून देणे,अशी विविध कार्य श्री.विनोद खटके यांनी केली आहेत... अशा सामाजिक कार्यासाठी ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन दर वर्षी ,महाराष्ट्र ,गुजरात,गोवा,राजस्थान,तामिळनाडू ,या राज्यातील होटकरुंची निवड करीत असते...यात विनोद खटके यांची निवड होऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विविध राज्यातील पुरस्कार प्राप्त सन्मानित व्यक्ती उपस्थित होते...विशेष म्हणजे मराठवाड्यातून श्री.विनोद खटके यांची एकमेव निवड झाली..सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे...

# पत्रकारांनी समाजाचे देणे लागतो या भावनेतून सकारात्मक पत्रकारिता करावी - ऋषिकेशदादा कराड



लातूर दि.१० :– पत्रकार समाजाचा तिसरा डोळा असून समाजाला योग्य दिशा देण्यासाठी प्रयत्न करावेत आजच्या ब्रेकिंग न्यूज च्या काळात चांगले उपक्रम दुर्लक्षित होता कामा नये याची काळजी घेऊन सकारात्मक पत्रकारिता करावी असे प्रतिपादन भाजयुमोचे प्रदेश सचिव तथा युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी केले.

राजमंत्र न्यूज चैनल च्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्ताने रेणापूर येथे मंगळवारी परमपूज्य विद्यानंद बाबा महाराज गातेगावकर यांच्या शुभहस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते ऋषिकेशदादा कराड हे होते तर याप्रसंगी भाजपाचे अनिल भिसे, अँड. दशरथ सरवदे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे बालाजी कदम शिवसेनेचे रविकांत चव्हाण, अमर चव्हाण, शिला आचार्य, इंदुताई ईगे, महेंद्र पिपळे राजमंत्रचे संपादक सुधाकर फुले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील नेत्रगावकर, दत्ता कुलकर्णी पानगावकर, मंगेश डोंगरजकर यांना जीवन गौरव तर पत्रकार चंद्रकांत कातळे, रफिक शिकलकर, अहिल्या कसपटे यांना दर्पण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रिंट मीडियात जो आनंद होता तो आज राहिला नाही, मात्र डिजिटल जमान्यातही प्रिंट मीडिया टिकून आहे असेही ऋषिकेश कराड यांनी बोलून दाखवले तर यावेळी मार्गदर्शन करताना परमपूज्य विद्यानंद बाबा महाराज गातेगावकर म्हणाले की, पत्रकारिता समाजाचे हित करण्यासाठी स्वतः स्वीकारलेली जबाबदारी आहे. त्यांच्या कार्याने शून्यातून विश्व होऊ शकते चुकीचे कार्य झाले तर एखाद्याचे जीवनही उध्वस्त होऊ शकते. स्तुती प्रिय काळ आहे सत्य प्रिय नको झाली असून दर्पण म्हणजे आरसा, जो खोटं बोलत नाही तेव्हा पत्रकारांनी समाजाच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. सत्य जगासमोर आणण्याचे आणि सत्य स्वीकारण्याची ध्यैर्य दाखवावे असे बोलून दाखवले. प्रारंभी दशरथ सरवदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुधाकर फुले यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी यांनी केले शेवटी विष्णू आचार्य यांनी आभार मानले या कार्यक्रमास अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE